# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थप्रशासन विभाग

---

## परिपत्रक

जा.क. अप्रवि / सेवार्थ / 2690 / 2014 दिनांक :– 18/20 / 03 / 2014

विषय :– एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये वेतन देयके निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ :– 1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012 / प्र.क्र. 169 / 8–अे, दि. 23.11.2012

2. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.–कृषि व पदुम विभाग क्र.कृषिवि 2012 / प्र.क्र. 169 / 8–अे दि. 31 जानेवारी 2014

या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी तसेच वेतन व लेखा अधिकारी, अकोला / नागपूर यांना कळविण्यात येते की, **मार्च 2014 चे वेतन देय एप्रिल 2014** एसएयु सेवार्थ प्रणालीमधून निर्गमित करावयाचे आदेश संदर्भ क्र. 1 नुसार करण्यात आलेले आहे.

कार्यालयातील उपलब्ध संगणक साधनसामुग्रीव्दारे किंवा खाजगी संगणक केंद्रामधून एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमध्ये मार्च 2014 चे देय एप्रिल 2014 वेतन निर्गमित करून घेण्यात यावेत. याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. जर यामध्ये काही तांत्रीक अडचण येत असल्यास, संबंधित आहरण व संवितरण अधिका–यांनी लेखी स्वरूपात अडचण नियंत्रक कार्यालयास त्वरीत सादर करावी.

याबाबत संबधित आहरण व संवितरण अधिकारी आणि वेतन व लेखाधिकारी अकोला / नागपूर हे व्यक्तिशः जबाबदार रहातील याची नोंद घ्यावी. जेणेकरून या विद्यापीठाचे एकत्रित देयक एसएयु सेवार्थ संगणक प्रणालीमधून निर्गमित करून शासनाकडे तपासणीसाठी सादर करणे शक्य होईल.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला